**Two Days State Level Webinar on**

# Public Relation in Government Sector

## 17-18 September 2021



पुढारी

# शासकीय जनसंपर्क हे आव्हानात्मक कार्य : संदीप माळवी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवमाध्यमांचा उदय व जनतेकडून होत असलेला अधिक वापर यामुळे शासकीय जनसंपर्काचे कार्य आव्हानात्मक बनले आहे, असे मत ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे शासकीय जनसंपर्क विषयावर आयोजित ऑनलाईन वेबिनारमध्ये ते बोलत होते. माळवी म्हणाले, आजच्या काळात जनसंपर्काचे कार्य हे परंपरागत व्याख्येपलीकडे गेले आहे. वेबिनारच्या दुसऱ्या सत्रात क्षेत्र प्रसिद्धी अधिकारी, सोलापूर अंकुश चव्हाण व पत्र सूचना कार्यालय, मुंबई येथील महेश चोपडे यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. सहयोगी प्रा. सचिन दिवाण यांनी आभार मानले.

**Pudhari Date 19-09-2021**

लोकमत

# जनसंपर्काचे कार्य खूप आव्हानात्मक

कोल्हापूर : नवमाध्यमांचा उदय आणि जनतेकडून त्याचा होत असलेला अधिक वापर यामुळे शासकीय जनसंपर्काचे कार्य खूप आव्हानात्मक बनले आहे, असे प्रतिपादन ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी शुक्रवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'शासकीय जनसंपर्क' या विषयावरील राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते.

## Lokmat Date- 22-09-2021

सकाळ

# जनसंपर्क कार्याचे मूल्यमापन आवश्यक : औदुंबर चव्हाण

## शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २१ः शासकीय जनसंपर्क केवळ प्रेसनोट काढण्यापुरता मर्यादित नसून ती आता एक शास्त्रशुद्ध आणि अद्ययावत कार्यप्रणाली झाली आहे. त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. लोकसहभागाला महत्त्व आहे. सतत मूल्यमापन करत राहून त्यानुसार बदल गरजेचे आहे, असे मत यूएनडीपी, दिल्ली येथील माहिती, शिक्षण आणि संवादतज्ज्ञ औदुंबर चव्हाण यांनी व्यक्त केले. शासकीय जनसंपर्क या विषयावर शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातर्फे आयोजित वेबिनारचा समारोप झाला. चर्चासत्राच्या अखेरच्या सत्रात ते बोलत होते.

चव्हाण म्हणाले, 'जनसंवाद प्रक्रियेत प्रथम अपेक्षित श्रोता गट निश्चित केला जातो. त्याला समजेल अशा भाषेत संदेश निर्माण करणे, तो योग्य माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवणे. लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे. संवादाची परिणामकारकता जाणून घेण्यासाठी त्या प्रक्रियेचे मूल्यमापन करणे आणि नंतर आवश्यक त्या सुधारणा करणे या बाबींना अत्यंत महत्त्व आहे.' सकाळच्या सत्रात महा-पारेषणचे मुंबई येथील मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद अवताडे यांनी आणि माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई येथील साहाय्यक निर्देशक निशिकांत तोडकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अवताडे यांनी महा-पारेषणच्या कार्याची त्यांच्या गृहपत्राची माहिती दिली. तोडकर यांनी मुख्यमंत्री कार्यालयाच्या जनसंपर्क कामाची माहिती दिली. पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. संजय घोडावत विद्यापीठाच्या सहायक प्राध्यापक अनुराधा इनामदार, चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले.

## Sakal Date-22-09-2021

पुण्यनगरी

# शासकीय जनसंपर्क हे आव्हानात्मक कार्य

## संदीप माळवी : शासकीय जनसंपर्क विषयावर शिवाजी विद्यापीठात वेबिनार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवमाध्यमांचा उदय आणि जनतेकडून होत असेलला अधिक वापर यामुळे शासकीय जनसंपर्काचे कार्य खूप आव्हानात्मक बनले आहे, असे मत ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'शासकीय जनसंपर्क' या विषयावर आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनारमध्ये प्रथम दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते.

ते म्हणाले, आजच्या काळात जनसंपर्काचे कार्य हे जनसंपर्काच्या परंपरागत



संदीप माळवी अंकुश चव्हाण महेश चोपडे

व्याख्येपलीकडे गेले आहे. शासकीय जनसंपर्क कार्य करत असताना लोकांच्या हातात नवमाध्यम उपलब्ध असल्यामुळे ते सरळ प्रश्न विचारू शकतात. त्यामुळे या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी अपडेट करणे आवश्यक आहे.

वेबिनारच्या दुसऱ्या सत्रात सोलापूर क्षेत्र प्रसिद्धी अधिकारी अंकुश चव्हाण आणि पत्र सूचना कार्यालय, मुंबई येथील महेश चोपडे यांनी मार्गदर्शन केले. अंकुश चव्हाण यांनी कोरोना काळात क्षेत्र प्रसिद्धी विभागामार्फत केलेल्या विविध कार्यांची माहिती दिली, तसेच त्यांनी भारतीय माहिती सेवा क्षेत्रात उपलब्ध नोकरीच्या संधी आणि तयारी याबद्दल मार्गदर्शन केले. महेश चोपडे यांनी केंद्र शासनाचा जनसंपर्क, डीएव्हीपी, पत्र सूचना कार्यालय, सेन्सॉर बोर्ड येथील कार्यपद्धतीविषयी माहिती दिली.

कार्यशाळेच्या सुरुवातीला विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक आणि वक्त्यांचे स्वागत केले. पत्रकार आणि विभागाचे सहयोगी प्राध्यापक सचिन दिवाण यांनी सूत्रसंचालन केले. या प्रसंगी तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती, संजय घोडावत विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ येथील पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी आणि प्राध्यपाक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यभरातून १९० पेक्षा अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि पत्रकार यांनी नावनोंदणी केली असून, वेबिनारकरिता मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

### आजची व्याख्याने

शनिवार, दि. १८ रोजी कार्यशाळेची सांगता होणार आहे. दुसऱ्या दिवशी वेबिनारमध्ये महापारेषणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद अवताडे, माहिती व जनसंपर्क संचनालायाचे सहायक निर्देशक निशिकांत तोडकर, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे (यूएनडीपी) माहिती शिक्षण आणि संवादतज्ज्ञ औदुंबर चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत. मार्गदर्शन करणारे सर्व व्याख्याते जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागाचे माजी विद्यार्थी आहेत.

KOLHAPUR
Page No.6 September 18, 2021

**Punyanagari Date – 18-09-2021**